# प्रेसनोट

दि.२९/०३/२०२२

## पाणी कनेक्शन देण्यासाठी लाच मागणी करून स्वीकारले प्रकरणी कंत्राटदारावर कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ अ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ५४ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | महेश तानाजी शिंदे, वय - ४६ वर्षे, धंदा - मनपा कॉन्ट्रॅक्टर (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- (तीस हजार रूपये) |
| स्वीकारलेली रक्कम | १७,०००/- (सतरा हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- २८/०३/२०२२.

सापळा दिनांक :- २९/०३/२०२२.

ठिकाण :- एस.एन.डी.टी. पाणीपुरवठा विभाग, पुणे मनपा, कर्वे रोड, पुणे येथील कार्यालयासमोर.

थोडक्यात माहिती :- तक्रारदार यांचे संबंधीतांच्या मिळकतीमध्ये पाण्याचे कनेक्शन देणेकरीता तक्रारदार यांनी चतुःश्रृंगी पाणी पुरवठा, विभाग, मनपा पुणे येथे अर्ज केला होता. सदरचे पाणी कनेक्शन मिळवून देण्यासाठी महेश शिंदे यानी ३०,०००/- रूपये लाचेची मागणी करून १५ हजार रूपये घेतले व आणखी १५ हजार रूपयांची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.विभागास दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांचे पाणी कनेक्शन मिळवून देण्यासाठी महेश शिंदे (कॉन्ट्रॅक्टर) यानी सहायक अभियंता व कनिष्ठ अभियंता मनपा, पुणे यांना द्यावे लागतात असे सांगून पाणी कनेक्शनसाठी १५ हजार रूपये लाच व प्लंबरसाठी २ हजार रूपये असे एकूण १७ हजार स्वीकारले म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक प्रणेता सांगोलकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे — ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.